लोकमत
कोल्हापूर, रविवार, दि. १ जून २०२५

# अकरावीला बायोमेट्रिक हजेरी, रोज कॉलेजला जावेच लागणार


## शिक्षण विभागाचा निर्णय : अकॅडमीत क्लास लावणाऱ्यांना लागणार चाप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊन अकरावी, बारावीसाठी अकॅडमीत क्लास लावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी, महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या जास्त असली तरी वर्गात मात्र, हाताच्या बोटावर मोजण्याइतपतच विद्यार्थी असतात. हे चित्र सर्व राज्यभर आहे.

त्यामुळे शिक्षण विभागाच्यावतीने अकरावीत बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती वाढवणे, तसेच शिष्यवृत्ती आणि सवलतींसाठी पारदर्शकता आणणे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय स्तुत्य असला तरी महाविद्यालयांत प्रवेश घेऊन क्लासेस करणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण होणार आहे.

### कोणत्या शाखेच्या किती?






### अकरावीची प्रवेश प्रक्रिया कशी राबविणार?

सध्या अकरावीची राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेसाठी २८५ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यात ६६ हजार १० इतक्या जागा असून येत्या ३ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे.

### जिल्ह्यात अकरावीच्या ६६ हजार जागा

यंदा कोल्हापूर जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेत ५२ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर अकरावीसाठी ६६ हजार १० जागांची प्रवेश क्षमता आहे. मात्र, आयटीआय, पॉलिटेक्निकसह इतर विविध अभ्यासक्रमांसाठीही विद्यार्थी प्रवेश घेतात.

**सरकारने विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेली बायोमेट्रिक हजेरी पद्धत अतिशय चांगली आहे. मात्र, अकॅडमीचे जे पीक फोफावले आहे, त्यावर कडक निर्बंध लावायला हवेत. सरकारने अकॅडमींवर जर कडक कारवाईचे धोरण अवलंबले तर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या निश्चित वाढेल.**

**डॉ. आर. आर. कुंभार,** प्राचार्य विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर.



### अकरावीच्या विद्यार्थ्यांना थम्ब अटेंडन्स बंधनकारक

कोचिंग क्लासच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक असेल. या निर्णयामुळे आता विद्यार्थ्यांना वर्षभरात किमान ७५ टक्के उपस्थिती नोंदवणे गरजेचे आहे.

A

तरुण भारत
सोमवार, २ जून २०२५

# विद्यार्थ्यांना मदत, माणसं जोडणं हीच सेवाभावी वृत्ती : डॉ. कुंभार

**कोल्हापूर :** सेवाभाव माणसाला घडवीत असतो. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी संस्था स्थापनेच्या माध्यमातून सुसंस्कारी आणि ज्ञानी विद्यार्थी घडवले. सेवाभाव आणि मानवतावादी मूल्यांच्या रुजवणुकीसाठी त्यांनी समर्पणाची वृत्ती गुरुदेव कार्यकर्त्यांत निर्माण केली. त्यामुळेच असे अनेक गुरुदेव कार्यकर्ते निर्माण झाले, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. ते शिवाजी माने यांच्या सेवानिवृत्ती समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमापूजनाने सुरूवात झाली. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. कुंभार यांच्या हस्ते शिवाजी माने यांचा सत्कार करण्यात आला. शिवाजी माने म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थेप्रती ऋणभाव व्यक्त केला. स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या मुळेच माझे आयुष्य घडले. भालचंद्र माने, प्रा. डी. बी. पुजारी, आर. व्ही. सदाफुले यांनी मनोगत व्यक्त केले. मानपत्राचे वाचन अधीक्षक संजय दळवी यांनी केले. प्रास्ताविक सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी केले. आभार बी. आर. करपे यांनी मानले. सुत्रसंचालन अमर जाधव यांनी केले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

2/6/25

लोकमत
कोल्हापूर, सोमवार, दि. २ जून २०२५

# अवघं शहर 'सायकल'वर; 'ग्रीन' कोल्हापूरचा नारा बुलंद

## 'लोकमत'ची ग्रीन कोल्हापूर सायकल राईड उत्साहात : हजारोंच्या संख्येने सायकलप्रेमी सहभागी

लोकमत GREEN KOLHAPUR CYCLE RIDE

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर शहरात 'लोकमत'तर्फे रविवारी आयोजित 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड'मध्ये बालचिमुकल्यांसह युवक, युवती व आबालवृद्धांनी सहभाग घेऊन राईडमध्ये उत्साह पेरला. या सायकल राईडमुळे अवघं शहर सायकलवर अवतरल्यासारखे वाटत होते. छाया : नसीर अत्तार

**कोल्हापूर :** हिरवाई नटलेल्या कोल्हापूरचे निसर्गसौंदर्य जपण्यासाठी जनजागृती व्हावी, या उद्देशाने 'लोकमत'तर्फे रविवारी सकाळी आयोजित 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड'मध्ये हजारो आबालवृद्ध, युवक, युवती व बालचिमुकल्यांनी सहभाग घेत 'ग्रीन कोल्हापूर'चा नारा बुलंद केला. शहरातील कचरा, वाढते प्रदूषण रोखण्याच्या दृष्टिकोनातून जनजागृती करण्यासाठी 'लोकमत'ने 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड' आयोजित केली होती. हॉटेल सयाजी येथून या राईडला सुरुवात झाली. जिल्हाधिकारी अमोल येडगे, 'लोकमत'चे सहायक उपाध्यक्ष मकरंद देशमुख, हॉटेल सयाजीचे जनरल मॅनेजर मुकेशकुमार रक्षित, 'अॅस्टर आधार'चे संचालक डॉ. संजय देशपांडे, सी. ए. असोसिएशनचे सेक्रेटरी अलोक शहा, मॅक्स प्रोटिनचे आकाश मोरे, डिकॅथलॉनचे सूरज जेके, विबग्योर हायस्कूलचे प्रिन्सिपॉल प्रवीण शर्मा, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलचे अध्यक्ष संजय भगत, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, 'रग्गेडियन'चे आकाश कोरगावकर, उद्योजक उत्तम फराकटे, डेक्कन स्पोर्ट्सचे उदय पाटील, आयर्नमॅन सूरज चव्हाण यांच्या उपस्थितीत राईडचा फ्लॅग ऑफ करण्यात आला. राईडच्या सुरुवातीपासूनच युवक, युवती, आबालवृद्ध सायकलपटूंमध्ये उत्साह संचारला होता.

युवकांनी देशी-परदेशी बनावटीच्या सायकलींसह जनजागृती करणारे संदेशाचे फलक झळकावत जनजागृतीचा संदेश दिला. जिल्ह्यातील विविध सायकल्स ग्रुप, शाळा, शहरातील सामाजिक काम करणारे ग्रुप, महिला, आदींनी उत्स्फूर्त सहभाग घेत या राईडमध्ये जोश आणला. सकाळी सात वाजता सुरु झालेली ही राईड टेंबलाई उड्डाणपूल-केएसबीपी पार्क-सायबर चौक, आईचा पुतळा, राजारामपुरी बारावी गल्ली, टेंबलाई उड्डाणपूलमार्गे पुन्हा हॉटेल सयाजी येथे परतली.

या पूर्ण मार्गावर नागरिकांनी सहभाग होत सायकलपटूंना टाळ्या वाजवून प्रोत्साहित केले. या राईडच्या माध्यमातून कोल्हापूरवासीयांना आगळेवेगळे वातावरण अनुभवायला मिळाले. रवी सुतार स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे व्हिडिओग्राफी विभागाचे प्रमुख यांचे सहकार्य लाभले.




'लोकमत'तर्फे रविवारी 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड'ची सुरुवात फ्लॅग ऑफने झाली. यावेळी मुकेशकुमार रक्षित, डॉ. संजय देशपांडे, अलोक शहा, आकाश मोरे, सूरज जेके, प्रवीण शर्मा, संजय भगत, डॉ. अनिरुद्ध पिंपळे, आकाश कोरगावकर उपस्थित होते. छाया : नसीर अत्तार

### सोनचाफ्याबरोबर पर्यावरणाचा सुगंध दरवळणार : डॉ. देशपांडे

पर्यावरणाला बळ देण्यासाठी अॅस्टर आधार हॉस्पिटल आणि सावली केअर सेंटर यांच्या वतीने प्रत्येक सायकलपटूला सोनचाफ्याचे रोप देण्यात आले. त्यांच्या या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळाला. सोनचाफ्याचे रोप घेण्यासाठीही सायकलपटूंनी गर्दी केली होती. हा सोनचाफा आम्ही वाढवून पर्यावरणाचा हा सुगंध सगळीकडे दरवळवू, असा निर्धार सायकलपटूंनी व्यक्त केला.

### जिल्हाधिकाऱ्यांचा जोश



जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी या राईडमध्ये सहभागी होत सायकलपटूंचा उत्साह द्विगुणित केला. 'लोकमत'ने पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेला उपक्रम प्रेरणादायी व 'ग्रीन कोल्हापूर'ला बळ देणारा असल्याचे जिल्हाधिकारी येडगे यांनी सांगितले.



लोकमत आयोजित 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड' उपक्रमात हॉटेल सयाजीलाही छोटेसे योगदान देता आले याचा आनंद आहे. निरोगी आरोग्यासाठी सायकल राईड अत्यंत गरजेची आहे. या उपक्रमामधून पर्यावरणाचा संदेश तर दिलाच; पण आरोग्याची काळजी घेण्याबाबतही या सायकल राइडने खऱ्या अर्थाने जनजागृती केली आहे.

**मुकेशकुमार रक्षित,**
जनरल मॅनेजर, हॉटेल सयाजी, कोल्हापूर.

### 'भारत माता की जय'चा जयघोष

सीए असोसिएशन, पेठवडगाव येथील ट्रेल हंटर्स ग्रुप, विवेकानंद व कमला कॉलेज येथील मुलींचा एनसीसी विभाग यांसह जिल्ह्यातील विविध सायकल ग्रुप सहभागी झाले होते. सायकल राईड मार्गावर जय भवानी, जय शिवाजीचा गजर, 'भारत माता की जय'चा जयघोष करत सायकलपटूंनी ही राईड पूर्ण केली.





'लोकमत' तर्फे रविवारी आयोजित 'ग्रीन कोल्हापूर सायकल राईड' मध्ये बालचिमुकले व प्रौढांनी सहभाग घेत पर्यावरणाचा संदेश दिला.

तरुण भारत संवाद
बुधवार, ४ जून २०२५



कोल्हापूर : ॲडव्हान्स जेईई परीक्षेत यश मिळवल्याबद्दल प्रथमेश ढगेचा सत्कार करताना विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे. सोबत संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एस. एन. साळुंखे, शिल्पा भोसले, गीतांजली साळुंखे आदी.

# विवेकानंद कॉलेजच्या प्रथमेशचे ॲडव्हान्स जेईई परीक्षेत यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

मे २०२५ मध्ये झालेल्या जेईई ॲडव्हान्स परीक्षेत विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी प्रथमेश ढगे याने ८६४१ एआरआय रँक मिळवून यश संपादन केले. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचें कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. एस. एन. साळुंखे, शिल्पा भोसले, प्रा. गीतांजली साळुंखे, प्रा. के. जे. गुजर, प्रा. एस. एन. ढगे, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. एन. एन. हिटणीकर, प्रा. एस. पी. पाटील, प्रा. आर. व्ही. घाटगे उपस्थित होते. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी अभिनंदन करुन त्याला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रथमेशला विवेकानंद कॉलेजच्या विज्ञान शाखेतील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

4/6/2025

4.6.2025

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स मुंबई

मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHMAR /2012/44621

वर्ष - १३ | अंक - १४३ | बुधवार दि. ४ जून २०२५ | पाने - ०८ | किंमत - ₹३

# JEE - Advance परीक्षेत विवेकानंद कॉलेजचे यश



कोल्हापूर : मे २०२५ मध्ये झालेल्या JEE - Advance परीक्षेत विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी प्रथमेश निलेश ढगे याने AIR ८६४१ रँक मिळवून धवल यश संपादित केले. त्याच्या या यशाबद्दल विवेकानंद कॉलेज च्यावतीने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. एस. एन. साळुंखे, सौ. शिल्पा भोसले, प्रा. सौ. गीतांजली साळुंखे, प्रा. के. जे. गुजर, प्रा. सौ. एस. एन. ढगे, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. एन. एन. हिटणीकर, प्रा. सौ. एस. पी. पाटील, प्रा. आर. व्ही. घाटगे व गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते. प्रथमेशला विवेकानंद कॉलेजच्या विज्ञान शाखेतील प्राध्यापकांचे बहुमोल मार्गदर्शन. प्रथमेश ढगेच्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी अभिनंदन करून त्याला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# हॅलो प्रभात


## जेईई अॅडव्हान्स परीक्षेत विवेकानंद कॉलेजचे यश

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

मे २०२५ मध्ये झालेल्या JEE advance परीक्षेत विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी कु. प्रथमेश निलेश ढगे याने [redacted] ८६४१ रँक मिळवून धवल यश संपादित केले. त्याच्या या यशाबद्दल विवेकानंद कॉलेजच्या वतीने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम ासाठी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार , प्रा.एस एन साळुंखे, सौ शिल्पा भोसले, प्रा सौ गीतांजली साळुंखे , प्रा के जे गुजर, प्रा सौ एस एन ढगे, प्रा एस टी शिंदे , प्रा एन एन हिटणीकर, प्रा सौ एस पी पाटील, प्रा आर व्ही घाटगेव गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते. त्याच्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी मा.प्राचार्या सौ शुभांगी गावडे यांनी अभिनंदन करुन त्याला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

हॅलो प्रभात

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जयंती सोमवारी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंतीनिमित्त सोमवार ९ जून रोजी सकाळी १०.३० वाजता पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखेअसणार आहेत. दुपारी २ वाजता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.



तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीउपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांनी केले आहे.

epaper.helloprabhat.in
04 Jun 2025 - Page 6

तरुण भारत संवाद
गुरूवार, ५ जून २०२५

# विवेकानंदच्या छात्रांना एनसीसी स्कॉलरशिप

**कोल्हापूर :** एन.सी.सी. मुख्यालय दिल्लीतर्फे ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनच्या विवेकानंदच्या छात्रांना २०२४-२५ करीता एन.सी.सी. कॅडेट वेल्फेअर सोसायटी व राज्य सरकारची शिष्यवृत्ती जाहीर झाली. त्याबद्दल विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार केला. रिध्दी रावराणे कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप, स्टेट गव्हर्मेंट स्कॉलरशिप साक्षी बच्चे, कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप वैष्णवी ढेंगे, कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप दिक्षा लोहार, कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप श्रावणी अडसुळ, कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप शिष्यवृत्ती जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे,एस. के. धनवडे यांनी अभिनंदन केले. छात्रांना महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार, ६ जून २०२५

''ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार''

**- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे**

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

२१३०, ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३ (महाराष्ट्र)

## WALK-IN-INTERVIEW

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित कोल्हापूर, सांगली, सातारा व रत्नागिरी या जिल्ह्यांतील फक्त अनुदानित विभागाकडे संस्था स्तरावरील एकत्रिकरणानुसार विविध विषयासाठी रिक्त असलेली तासिका तत्त्वावरील तात्पुरत्या स्वरूपातील (सी. एच. बी.) पदे शै. वर्ष २०२५-२६ करिता भरावयाची आहेत. जाहिरातीमध्ये नमूद केलेली पदे संभाव्य असल्याने पद संख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

थेट मुलाखतीसाठी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतीभवन, २१३०, ई, वॉर्ड, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे दि. १७/०६/२०२५ रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत मूळ कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित रहावे. तसेच विहित नमुन्यातील नोकरी अर्ज मुलाखतीच्या ठिकाणी रक्कम रुपये १००/- रोख भरून, तो भरून देणे आवश्यक आहे. अधिक माहिती संस्थेच्या खालील संकेतस्थळावर जावून पहावी. www.vivekanandshikshansanstha.edu.in

सही/- **सचिव**

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर**

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, ६ जून २०२५

संक्षिप्त

## विवेकानंद महाविद्यालयाच्या छात्रांना 'एनसीसी' स्कॉलरशिप

कोल्हापूर : 'एनसीसी' मुख्यालय दिल्लीतर्फे ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनच्या विवेकानंद कॉलेजच्या छात्रांना २०२४-२५ करिता एनसीसी कॅडेट वेल्फेअर सोसायटी व राज्य सरकार शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. त्याबद्दल प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यात रिद्धी रावराणे, साक्षी बच्चे, वैष्णवी ढेंगे, दीक्षा लोहार, श्रावणी अडसुळ यांना कॅडेट वेल्फेअर सोसायटी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. झाल्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रबंधक एस. के. धनवडे यांनी अभिनंदन केले. छात्रांना महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

हॅलो प्रभात दि. ६/६/२०२४



# विवेकानंद कॉलेजमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा

कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील विवेकानंद कॉलेजमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने छ. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन कॉलेजचे प्राचार्य डॉ आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत स्टाफ सेक्रेटरी डॉ. कविता तिवडे यांनी केले. त्यानंतर इतिहास विभागप्रमुख डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी यांनी महाराजांचा राज्यकारभार, आरमार विषयक धोरण, इत्यादी विषयी माहिती दिली. या कार्यक्रमासाठी विवेकानंद कॉलेजचे डॉ. ई. बी.आळवेकर, डॉ. जी. एस. उबाळे, हितेंद्र साळुंखे, प्रबंधक सचिन धनवडे, विवेकानंद कॉलेजचे ज्युनिअर व सिनिअर कॉलेजचे प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होत.

Pr 9.6.2025

हॅलो प्रभात

दि. 7.6.202



# डॉ. संजय लठ्ठे यांची अभ्यास दौऱ्यासाठी निवड

कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर मधील भौतिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ.संजय लठ्ठे यांची कोच युनिव्हर्सिटी, इस्तंबूल, तुर्की येथे एक महिन्याच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. डॉ लठ्ठे हे दि. २३ मे ते २१ जून २०२५ दरम्यान तेथील विद्यापीठात संशोधनाचे काम पार पाडतील. कोच विद्यापीठातील प्रा. लिव्हेंट देमिरेल यांच्या संशोधन प्रयोगशाळेत आपोआप स्वच्छ होणाऱ्या सोलर सेल पॅनल या विषयावर ते संशोधन करणार आहेत. डॉ. संजय लठ्ठे यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ.श्रुती जोशी, प्रबंधक सचिन धनवडे यांचे सहकार्य लाभले.

PR 9.6.2025

epaper.helloprabhat.in
07 Jun 2025 - Page 4

हॅलो प्रभात

दि - 7 - 6 - 2025

# 'विवेकानंद'मध्ये जागतिक पर्यावरण दिन साजरा



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जागतिक पर्यावरण दिना निमित्त, ५ जून रोजी डॉ. पी. बी. तेली, डॉ. बी. टी. दांगट आणि डॉ. जी. के. सोनटक्के यांनी संपादित केलेल्या एनव्हिरॉनमेंटल कन्सर्वेशन, सस्टेनेबिलिटी आणि क्लाइमेट एक्शन या पुस्तकाचे प्रकाशन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले.

या पुस्तकासाठी संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कौस्तुभ गावडे , संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, शैक्षणिक गुणवत्ता हमीच्या डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्री श्रीराम साळुंखे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, श्री गणेश सातव, वरिष्ठ शिक्षणाधिकारी - द क्लाइमेट चेंज रियालिटी प्रोजेक्ट इंडिया यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी विवेकानंद कॉलेजचे प्रबंधक श्री सचिन धनवडे , विवेकानंद संस्थेचे गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते.



PR
9/6/2025

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ९ जून २०२५

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार ।।

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर



## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची
## १०७ वी जयंती समारंभ



**सस्नेह निमंत्रण**

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे :

**मा. नामदार प्रकाशरावजी आबिटकरसो**

(सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा पालकमंत्री, कोल्हापूर)

कार्यक्रमाचे अध्यक्षः

**मा. प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे** (कार्याध्यक्ष)

निमंत्रक : **प्राचार्या सौ. शुभांगी गावडे** (सचिवा)

कार्यक्रम सोमवार, दिनांक ९ जून २०२५ रोजी, सकाळी १०.३० वा.

स्थळ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर.

पुढारी | ६
सोमवार । ९ जून २०२५

# डॉ. संजय लट्ठे यांची तुर्की विद्यापीठात अभ्यास दौऱ्यासाठी निवड

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयामधील भौतिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय लट्ठे यांची कोच युनिव्हर्सिटी इस्तंबूल, तुर्की येथे एक महिन्याच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. डॉ. लट्ठे २३ मे ते २१ जूनदरम्यान तेथील विद्यापीठात संशोधनाचे काम करणार आहेत. कोच विद्यापीठातील प्रा. लिव्हेंट देमिरेल यांच्या संशोधन प्रयोगशाळेत आपोआप स्वच्छ होणाऱ्या सोलर सेल पॅनल या विषयावर ते संशोधन करणार आहेत. डॉ. लट्ठे यांना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक सचिन धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद

सोमवार, ९ जून २०२५

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०७ वी जयंती सोमवारी ९ जून रोजी सकाळी संस्थेत होत आहे.

प्रमुख पाहुणे पालकमंत्री प्रकाश आबिटकर लाभले आहेत. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी पत्रकाव्दारे केले आहे.

तरुण भारत सोमवार, ९ जून २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये पर्यावरण दिन साजरा

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त डॉ. पी. बी. तेली, डॉ. बी. टी. दांगट आणि डॉ.जी. के. सोनटक्के यांनी संपादित केलेल्या एन्व्हर्हॉनमेंट कन्सर्वेशन, सस्टेनेबिलिटी आणि क्लाइमेट ॲक्शन" या पुस्तकाचे प्रकाशन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले.

या पुस्तकासाठी संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. कुंभार, गणेश सातव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी प्रबंधक सचि[illegible] धनवडे, विवेकानंद संस्थेचे शिक्ष[illegible] कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद
बुधवार, ११ जून २०२५

# 'विवेकानंद' येथे २७ रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन



गोकुळ शिरगाव : येथे रोजगार मेळावा आयोजन बैठकीच्या वेळी उपस्थित पदाधिकारी.

वार्ताहर
गोकुळ शिरगाव

पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत दिनांक २७ जून रोजी कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज येथे रोजगार मेळावा होणार असून याच्या आयोजनाची बैठक आज गोकुळ शिरगाव एमआयडीसी मध्ये घेण्यात आली.

रोजगार मेळाव्याचा मुख्य हेतू बेरोजगार युवकांना नोकरी मिळवून देणे हा आहे. या मेळाव्यात जिल्ह्यातून अनेक कंपन्यां सहभागी होणार आहेत. अर्जकर्त्या उमेदवाराला त्याच्या स्किलनुसार काम देण्याचे कार्य या कंपन्या करणार आहेत. वाढती बेरोजगारीची समस्या दूर करणे हेच या रोजगार मेळाव्याचे ध्येय आहे. या मेळाव्यामध्ये दहावी, बारावी, पदवीधर,इंजिनियर,मेकॅनिकल अशा सर्व पदवीधारकांना सामावून घेणार असल्याचे सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे अभियंता जमीर करीम यांनी सांगितले.

२७ जून रोजी कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज येथे आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. गोशीमा, मॅक, स्मॅक, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन ,जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कामगार आयुक्त,औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोल्हापूर, मुरगुड, हातकणंगले, पन्हाळा या संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उमेश देशमुख,स्वरूप कदम,राजू पाटील, दीपक चोरगे ,सुनील शेळके, अमोल यादव, महेश आवटे ,विजय नार्वेकर,विजय कुलकर्णी ,मोहन कुशिरे,विठ्ठल पाटील, भक्ती भद्रा उपस्थित होते.

तरुण भारत संवाद बुधवार, दि. ११ जून २०२५

# डॉ. बापूजी साळुंखे यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या इमारतीसमोरील डॉ. बापूजी साळुंखे पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, संशोधक विद्यार्थी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

तरुण भारत संवाद ■ बुधवार, ११ जून २०२५

# इंटरनॅशनल ओपन चेसमध्ये कोल्हापूरचा ऋषिकेश दहावा

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या २१ वी दिल्ली इंटरनॅशनल ओपन ग्रँडमास्टर बी–कॅटेगरी चेस टुर्नामेंटमध्ये कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकरने दर्जेदार कामगिरी केली. त्याने स्पर्धेच्या १० फेरीत ८ गुणांची कमाई करत १० वा क्रमांक मिळवला. तसेच त्याला स्पर्धेत संयुक्तपणे तिसरा क्रमांकही मिळाला आहे. या यशासाठी त्याने ८ सामने जिंकण्याची कौतुकास्पद कामगिरी केली. दिल्ली बुद्धिबळ असोसिएशनच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

देशभरातील काही हजाराच्या घरात बुद्धिबळपटूंचा सहभाग असलेली ही स्पर्धा ए. बी. आणि सी अशा तीन गटांमध्ये आयोजित करण्यात आली होती. यापैकी बी कॅटेगरीमधून ऋषिकेशने स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले. याच बी कॅटेगरीमधून देशभरातून ८५८ बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला होता. या सर्वांचे रेटिंग १९०० खालील होते. दरम्यान, स्पर्धेत ८५८ बुद्धिबळपटूंच्या तुलनेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तेलंगणा येथील सार्थक अदबतलाने विजेतेपद मिळवले. त्याला बक्षीस वितरण समारंभात ४ लाख रुपये व चषक असे बक्षीस देऊन गौरवले. दुसरा क्रमांक मिळवलेल्या सुंदरम कुमार (दिल्ली) याला ३ लाख रुपये, चषक असे बक्षीस देऊन सन्मानित केले. तसेच चेक तोहिलने तिसरा क्रमांक पटकावला. त्याला २ लाख रुपये, चषक असे बक्षीस देऊन गौरवले. याचबरोबर १० वा क्रमांक पटकावलेल्या कोल्हापूरच्या ऋषिकेशला ६० हजार रुपये, चषक देऊन गौरवले. ऋषिकेशची सख्खी बहीण शर्वरी कबनूरकरनेही बी–कॅटेगरीतूनच बुद्धिबळ स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले होते. तीनेही चांगला खेळ करत ५ गुणांची कमाई केली. ऋषिकेश हा विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी असून त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



■ टुर्नामेंटच्या बी कॅटेगरीत कामगिरी

गुरुवार दि. १२ जून २०२५ । वर्ष -१३ । मुंबई
मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत । अंक
Follow Us on Social Media
www.theglobaltimes.org
EPaper
द ग्लोबल टाइम्स
मराठी दैनिक
भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब
Register No. : RNI - MAHMAR /2012/44621



# विवेकानंदमध्ये ए.आय. आणि रोबॅटिक्स या अभ्यासक्रमांचे उदघाटन

**कोल्हापूर : विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील संस्कार केंद्राच्या ए.आय. आणि रोबॅटिक्स या नवीन अभ्यासक्रमाचे उदघाटन पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अभ्यासक्रम पुस्तिकेचे वाटप विद्यार्थी व शिक्षकांना करण्यात आले.**



ए.आय. आणि रोबॅटिक्स या ज्ञानक्षेत्राचा जगभरात वेगाने विस्तार होत आहे. आज या तंत्रज्ञानाच्या मदतीने जग क्रांतीकारक वाटचाल करीत आहे. अगदी शेताच्या बांधापासून चांद्रयान मोहिमेपर्यंत सर्व प्रकारची कामे सुलभ होत आहेत. या ज्ञानशाखेची माहिती व ज्ञान विद्यार्थ्यांना उपलब्ध करण्यासाठी ए.आय. आणि रोबॅटिक्स या नवीन अभ्यासक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने करून महाराष्ट्राच्या शैक्षणिक चळवळीत आघाडी प्राप्त केली आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०७व्या जयंती समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून नाम. आबिटकर बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनात हा जयंती समारंभ हजारो गुरुदेव कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी करून दिली. यावेळी डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. डी. आर. तुपे, प्रा. हवालदार, प्रा. दिव्या बावर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेच्यावतीने नाम. प्रकाश आबिटकर यांचा सत्कार करण्यात आला. सिरपचे अधिकारी रोहित शिंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच अतिरिक्त आयुक्त संजय गुरव यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्था सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर जिल्हा विभाग प्रमुख श्रीराम साळुंखे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, श्रीमती श्रध्दा गुरगुडे, संस्थेचे पदाधिकारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. आभार संस्था सहसचिव एस. एम. गवळी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. कविता तिवडे व प्रा. गीतांजली साळुंखे यांनी केले.

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, १३ जून २०२५

# आंतरराष्ट्रीय ग्रँड मास्टर बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश कबनूरकरचे यश

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



ऋषिकेश कबनूरकर

दिल्ली बुद्धिबळ असोसिएशन तर्फे नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय ग्रँड मास्टर २००० फिडे रेटिंग खालील बी कॅटेगरी बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकर याने १० फेरीत ८ गुण मिळवून संयुक्त तिसरा क्रमांक मिळवला. क्रमवारीत दहावा क्रमांक मिळविल्याने त्याला ६० हजार रुपये आणि पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत तेलंगणा राज्यातील सार्थक अदबतला विजेता ठरला. त्याला चार लाख रुपये बक्षीस मिळाले.

स्पर्धेला देशभरातील तब्बल ८५८ खेळाडूंनी भाग घेतला. यात आंतरराष्ट्रीय मानांकित ७३९ खेळाडू होते. ऋषिकेशची बहीण शर्वरी कबनूरकर हिने पाच गुण मिळवले. बी कॅटेगरीच्या स्पर्धेला एकूण ३५ लाख रुपये बक्षीस होते. तीन विभागात स्पर्धा खेळण्यात आली. ग्रँड मास्टर, २ हजार रेटिंगच्या खालील आणि १७०० रेटिंगच्या खाली अशा तीन कॅटेगिरी मध्ये ही स्पर्धा खेळण्यात आली. स्पर्धेला एकूण बक्षीस १ कोटी २१ लाख रुपये होते.

ऋषिकेश स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी असून त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, बुद्धिबळ प्रशिक्षक कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
मंगळवार, १७ जून २०२५

# प्रा. एस. पी. थोरात यांना पीएच. डी.



कोल्हापूर : प्रा. संजय थोरात यांना शिवाजी विद्यापीठातील गणित विषयाची पीएच. डी. पदवी जाहीर करण्यात आली आहे. त्यांनी 'ए स्टडी ऑफ सोमे जनरलायझेशन ऑफ लॅटीक्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटीव्ह लॅटिक्स' यावर शोधप्रबंध सादर केला. या विषयासाठी त्यांना शिवाजी विद्यापीठ संलग्नित कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी येथील डॉ. संताजी खोपडे यांचे मार्गदर्शन लाभले. सध्या ते विवेकानंद कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. शिवाजी विद्यापीठातील गणित अधिविभागप्रमुख डॉ.एम.टी. गोफणे, डॉ. सरिता ठकार, प्रा. के. डी. कुच्चे, डॉ. एस. पी. पाटणकर, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे सहकार्य लाभले.

पुण्य नगरी | मंगळवार, १७ जून २०२५

# प्रा. एस. पी. थोरात यांना पीएच.डी.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील प्रा. संजय थोरात यांना शिवाजी विद्यापीठाकडून गणित विषयात पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी शिवाजी विद्यापीठ संलग्नित कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी येथील डॉ. संताजी खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनकार्य पूर्ण केले. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे गणित विभागप्रमुख डॉ. एम. टी. गोफणे, प्रा. डॉ. सरिता ठकार, प्रा. के. डी. कुच्चे, प्रा. एस. पी. पाटणकर यांचे मार्गदर्शन लाभले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आदींचे सहकार्य लाभले.

तरुण भारत संवाद

गुरुवार, १९ जून २०२५

# 'विवेकानंद'चे एम. एच. टी. सीईटी परीक्षेत घवघवीत यश

**कोल्हापूर :** एम. एच. टी. सीईटी परीक्षेमध्ये विवेकानंद कॉलेजचे तब्बल ४२५ पेक्षा अधिक विद्यार्थी अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, कृषी अभ्यासक्रमासाठी पात्र ठरले. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा एम. एच. टी. सीईटी २०२५ च्या निकालात पीसीएम गटामध्ये रेहान मुल्ला ९९.८७, सिध्दी रेडेकर ९९.६६, तनिषा चिटणीस ९९.४९, प्रगती भोरे ९९.४८, किथ डालमेट ९९.४३ टक्के गुण संपादन केले. पीसीबी गटामध्ये समृध्दी काळे ९९.१५, द्रुती मगदूम ९८.४१, देवेंद्र गायकवाड ९८.३८, निधी बागलकर ९७.८९, ओजस यादव ९६.८० टक्के गुण संपादन केले. ८५ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवले. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना विज्ञान विभाग प्रमुख प्रा एम. आर. नवले, डॉ. अश्विनी पाटील, प्रा. के. जे. शिंदे, प्रा. एन. एन. हिटणीकर, डॉ. एल. ई. नरोन्हा, रजिस्टार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

19.6.25

हॅलो प्रभात

# विवेकानंद कॉलेजचे MHT-CET परीक्षेत घवघवीत यश

## ४२५ पेक्षा अधिक विद्यार्थी अभ्यासक्रमासाठी पात्र

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा MHT-CET २०२५ मध्ये विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. तब्बल ४२५ हून अधिक विद्यार्थी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी पात्र ठरले असून, ८५ विद्यार्थ्यांनी ९० पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत.

पीसीएम गटात टॉपर्स : रेहान मुल्ला - ९९.८७ पर्सेंटाइल, सिध्दी रेडेकर - ९९.६६, तनिषा चिटणीस - ९९.४९, प्रगती भोरे - ९९.४८,किथ फ्रान्सिस डालमेट - ९९.४३

पीसीबी गटात टॉपर्स : समृद्धी काळे - ९९.१५ पर्सेंटाइल, द्रुती अरुणकुमार मगदूम - ९८.४१,देवेंद्र गायकवाड - ९८.३८,निधी बागलकर - ९७.८९,ओजस यादव - ९६.८०

या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी मा. प्रा. शुभांगी गावडे, सीईओ श्री. कौस्तुभ गावडे आणि कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना विज्ञान विभागप्रमुख प्रा. एम.आर. नवले, डॉ. अश्विनी पाटील, प्रा. के. जे. शिंदे, प्रा. एन.एन. हिटणीकर, डॉ. एल.ई. नरोन्हा, रजिस्ट्रार श्री. एस.के. धनवडे तसेच सर्व प्राध्यापकांचे योग्य मार्गदर्शन व परिश्रम लाभले.

epaper.helloprabhat.in
19 Jun 2025 - Page 1

# हॅलो प्रभात

## 'विवेकानंद'मध्ये' विवेक-वार्षिकचे प्रकाशन संपन्न



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे महाविद्यालयीन 'विवेक' - वार्षिक २०२४-२५' या विशेषांकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रकाशनानंतर बोलताना प्राचार्य डॉ. साळुंखे यांनी विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता, बौद्धिक अभिव्यक्ती आणि साहित्यिक जाणीव विकसित करण्यासाठी वार्षिकाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच त्यांनी संपादक मंडळाच्या परिश्रमांचे विशेष कौतुक केले.या कार्यक्रमात प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर,प्रा.डॉ. कविता तिवडे,प्रा.डॉ.प्रदीप पाटील, प्रा. डॉ. आरिफ महात,प्रा. अशोक पाटील, प्रा.संतोष कुंडले, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. नदाफ, प्रा. समीर पठाण उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, २२ जून २०२५



**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय योग दिन (२१ जून) सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमीत्ताने शाळा-महाविद्यालयांसह विविध संस्था-संघटना, तालीम मंडळांच्या वतीने शनिवारी दिवसभर आरोग्यदायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

## विवेकानंद महाविद्यालय

आंतरराष्ट्रीय योग दिन विवेवकानंद महाविद्यालयात साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व सांगितले. आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम डॉ. राजश्री पाटील, योग प्रशिक्षिका आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी देविका माने, शिवदीप वेदपाठक, अभिजित यांनी योग, यम, नियम धारणा, प्रत्याहार याचे विवेचन निरनिराळ्या योग आसनांच्याद्वारे कृती आधारित योगासने विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. कार्यक्रमाचे आयोजन आय.क्यू.ए.सी. डॉ. श्रुती जोशी, डॉ. विकास जाधव, मेजर सुनीता भोसले, डॉ. संदीप पाटील यांच्यामार्फत करण्यात आले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

पुण्य नगरी | रविवार, २२ जून २०२५

# निरोगी शरीर, मनासाठी योग आवश्यक : प्राचार्य कुंभार

## विवेकानंद कॉलेजमध्ये योग दिन उत्साहात

**कोल्हापूर :** शरीर व मन निरोगी राहण्यासाठी सर्वांनी नियमितपणे योगा करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

योग प्रशिक्षिका डॉ. राजश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले. देविका माने, शिवदीप वेदपाठक, अभिजित यांनी कृती आधारित योगासने विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. श्रुती जोशी, जीमखानाप्रमुख डॉ. विकास जाधव, एनसीसीप्रमुख मेजर सुनीता भोसले, एनएसएस विभागाचे डॉ. संदीप पाटील यांनी केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, ६ महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स बटालियनचे कर्नल संधान मिश्रा यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रास्ताविक डॉ. विकास जाधव यांनी केले. आभार प्रा. सुप्रिया पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन एनसीसी कॅडेट सायली वडकर यांनी केले. रजिस्टार एस. के. धनवडे यांचे सहकार्य लाभले.



कोल्हापूर : १) दै. पुढारी व पीसीईटी आयोजित कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी तुडुंब गर्दी केली. यावेळी बोलताना विवेक वेलणकर, डॉ. आर. एस. जहागीरदार आणि डॉ. सागर पांडे. (छाया : मिलन मकानदार)

# प्रचलित करिअर वाटांच्या पलीकडे पाहा

## तज्ज्ञांचा सल्ला; 'पुढारी' व पीसीईटी आयोजित कार्यशाळेस तुडुंब गर्दी : गुणवंतांचा सन्मान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर केवळ डॉक्टर किंवा इंजिनिअरिंगमधील प्रचलित वाटांचा विचार न करता पलीकडे जाऊन नीट, जेईईसारख्या परीक्षांमधून उपलब्ध होणाऱ्या दुर्लक्षित; पण आकर्षक करिअर संधींचा शोध घ्यावा, असा सूर येथील शाहू स्मारक भवनात आयोजित करिअर मार्गदर्शन सेमिनारमध्ये उमटला.

बारावीनंतर पुढे काय? या यक्ष प्रश्नाने गोंधळलेल्या हजारो विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या दिशा दाखवणारा भव्य मार्गदर्शन सोहळा येथील शाहू स्मारक भवनात प्रचंड उत्साहात पार पडला. दैनिक 'पुढारी', पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट आणि पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी प्रचंड गर्दी करत प्रतिसाद दिला.

पुढारी

PCET's Pimpri Chinchwad University
Learn | Grow | Achieve

भविष्यात असंख्य संधी आहेत, असा सल्ला विविध तज्ज्ञांनी दिला, तर दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक विवेक वेलणकर यांनी, नीट आणि जेईईमधूनच मिळणाऱ्या; पण फारशा चर्चेत नसलेल्या आकर्षक संधींचा खजिना विद्यार्थ्यांपुढे खुला केला. ते म्हणाले, डॉक्टर, इंजिनिअरच्या पुढेही जग आहे. आयुर्वेद, होमिओपॅथी, व्हेटर्नरी, फिजिओथेरपी, फार्मसी, आर्किटेक्चर, कृषी, फूड टेक्नॉलॉजी ते अगदी सशस्त्र दल, वैद्यकीय महाविद्यालयापर्यंत असंख्य पर्याय तुमची वाट पाहत आहेत. यासाठी चौकटीबाहेर जाऊन विचार करा.

नूतन महाराष्ट्र ग्रुपचे आर. एस. जहागीरदार यांनी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतील बारकावे समजावून सांगितले. सर्वांनी कॉम्प्युटरच्या मागे न धावता ब्लॉक चेन, मायक्रो प्रोसेसर चिप मॅन्युफॅक्चरिंग यासारख्या भविष्यातील क्षेत्रांचा वेध घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटीचे सहायक प्राध्यापक सागर पांडे यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशिन लर्निंग आणि डेटा सायन्सचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, तुमची शाखा कोणतीही असो, एआयचे ज्ञान तुम्हाला इतरांपेक्षा चार पावले पुढे ठेवेल.

या प्रेरणादायी मार्गदर्शनासोबतच गुणवंतांचा सन्मान सोहळा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला.

यावेळी दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये विवेकानंद महाविद्यालयाचे विश्वंभर कुलकर्णी, मंगल गवळी, न्यू कॉलेजचे डॉ. अनिल सूर्यवंशी, तसेच कुलवीर कांबळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी नूतन महाराष्ट्र ग्रुपचे सहायक प्रा. दिग्विजय पाटील आणि दै. 'पुढारी'चे वरिष्ठइव्हेंट मॅनेजर राहुल शिंगणापूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार, २७ जून २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये आज रोजगार मेळाव्याचे आयोजन

कोल्हापूर, ता. २६ : मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत शुक्रवारी (ता. २७) पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा होणार आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्रातर्फे विवेकानंद कॉलेजच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूटमध्ये हा मेळावा होईल. सकाळी दहा ते सायंकाळी चार या वेळेत हा मेळावा होणार असून पुण्यासह जिल्ह्यातील अठ्ठावीस आस्थापनांसाठी विविध पदांची भरती होणार आहे.

पुण्यातील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीत तीनशे पदांची भरती होणार असून दहावी व आयटीआय विविध अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना येथे संधी असेल. उचगाव व कागल येथील घाटगे पाटील इंडस्ट्रीजमध्ये ९२ तर किर्लोस्कर ऑईल इंजीन्समध्ये १८५ पदांची भरती होणार आहे. आयटीआय, डिप्लोमा व पदवीधारक उमेदवारांना येथे संधी असेल. त्याशिवाय इतर आस्थापनांतही विविध संधी उपलब्ध असतील. विविध योजनांची माहितीही मेळाव्यात दिली जाणार आहे. मेळाव्यासाठी येताना बायाडोटाच्या पाच प्रती घेऊन उमेदवारांनी यावे, असे आवाहन केले आहे.

.6.2025

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २७ जून २०२५

## विवेकानंद महाविद्यालय

विवेकानंद महाविद्यालयामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अवधूत टिपुगडे यांनी 'राजर्षी शाहू महाराज कार्य आणि कर्तृत्व' या विषयावर विचार मांडले. डॉ. दत्ता जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष कोळी यांनी आभार मानले. याप्रसंगी डॉ. श्रुती जोशी, प्रा. बी. एस. कोळी, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. ई. बी. आळवेकर, प्रा. एम. आर, नवले, एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

शुक्रवार, २७ जून २०२५

## विवेकानंद कॉलेज

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. कुंभार म्हणाले, बहुजन समाजात शिक्षणाचे नवनवे प्रयोग शाहू महाराज यांनी केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचा करवीर संस्थानामधला शाहूंचा आदेश भविष्यकाळात समाजात आमूलाग्र बदल घडविणारा ठरला. यावेळी डॉ. अवधूत टिपुगडे, डॉ. दत्ता जाधव, डॉ. संतोष कोळी, डॉ. श्रृती जोशी, प्रा. बी. एस. कोळी, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. ई. बी. आळवेकर, प्रा. एम. आर, नवले आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी | शुक्रवार, २७ जून २०२५

## विवेकानंद कॉलेज

विवेकानंद कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. कुंभार, डॉ. अवधूत टिपुगडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. दत्ता जाधव यांनी केले. आभार डॉ. संतोष कोळी यांनी मानले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, स्टाफ सेक्रेटरी प्रा. बी. एस. कोळी, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. ई. बी. आळवेकर, प्रा. एम. आर. नवले, प्रबंधक एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

सकाळ
दि. 28/06.2025

# विवेकानंद कॉलेज

विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. डॉ. अवधूत टिपुगडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. दत्ता जाधव यांनी केले. आभार डॉ. संतोष कोळी यांनी मानले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, प्रा.बी.एस. कोळी, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. ई. बी. आळवेकर, प्रा. एम. आर, नवले, प्रबंधक एस. के. धनवडे उपस्थित होते.

सकाळ : दि. 28/06/2025

# शासनाकडून रोजगाराच्या अनेक संधी

## पालकमंत्री आबिटकर : रोजगार मेळाव्यात २९० उमेदवारांची निवड

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : 'शासन शिक्षणासह रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देत आहे. यामध्ये मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानातून तरुणांना बळ दिले जात आहे,' असे प्रतिपादन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे केले. दरम्यान, पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात २९० उमेदवारांची निवड करण्यात आली.

येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात जिल्हा कौशल्य विकास विभाग व स्वामी विवेकानंद संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डॉ. अभयकुमार साळुंखे, कौशल्य विकासचे सहायक आयुक्त जमीर करीम, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी उमेश देशमुख, गोकुळ शिरगाव एमआयडीसीचे अध्यक्ष स्वरूप कदम, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आदी प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर :** येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात शुक्रवारी आयोजित रोजगार मेळाव्यात पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित मान्यवर.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याकाळात सुरू केलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून तरुणांना सहा हजार, आठ हजार, दहा हजार अशा वेगवेगळ्या पद्धतीने विद्यावेतन देण्यात येते. ही योजना तरुणांना वेगवेगळ्या ठिकाणी काम करीत असताना अधिकचे बळ देणारी आहे.'

दरम्यान, मेळाव्यास एकूण ६३६ उमेदवार उपस्थित होते. पात्रतेनुसार ३६० मुलाखती झाल्या. त्यापैकी प्राथमिक निवड २४७, तर अंतिम निवड ४३ जणांची झाली.

उमेश देशमुख यांनी मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानाबाबत माहिती देऊन तरुणांचा पुणे, मुंबईकडे असणारा नोकरीचा कल कोल्हापूरकडे वाढावा, यासाठी अधिकचे प्रयत्न व्हावेत, असे मत व्यक्त केले.

स्वरूप कदम यांनी असा मेळावा दर महिन्याला व्हावा, त्याचा युवकांनी लाभ घेत पुण्या, मुंबईला न जाता कोल्हापुरातच पर्याय निवडावा, असे आवाहन केले. कौस्तुभ गावडे यांनी प्रत्येकाला नोकरी मिळण्यासाठी असे मेळावे ही एक संधी असल्याचे सांगितले. जमीर करीम यांनी सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांच्या कौशल्यानुसार वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे सांगितले.

लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. २८ जून २०२५

# २९० तरुण-तरुणींना नोकरीची संधी

## 'विवेकानंद'मध्ये रोजगार मेळावा : ६३६ जण सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानाअंतर्गत झालेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात २९० उमेदवारांना नोकरीची संधी मिळाली, तर ४३ जणांची अंतिम निवड झाली. स्वामी विवेकानंद संस्थेच्या सभागृहात आयोजित मेळाव्याचे उद्घाटन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी शिक्षण संस्थेचे प्रमुख अभयकुमार साळुंखे, सहायक आयुक्त कौशल्य विकास जमीर करीम, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी उमेश देशमुख, गोकुळ शिरगाव एमआयडीसीचे अध्यक्ष स्वरूप कदम, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्यासह उद्योजकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री आबिटकर म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून तरुणांना सहा हजार, आठ हजार, दहा हजार भत्ता दिला जातो. ही योजना नोकरी, रोजगार मिळवण्यासाठी बळ देणारी आहे.

**४३**
जणांची रोजगार मेळाव्यात अंतिम निवड झाली.



कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात शुक्रवारी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत झालेल्या रोजगार मेळाव्याला युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्यात ६३६ उमेदवार सहभागी झाले. पात्रतेनुसार ३६० मुलाखती झाल्या. त्यापैकी २४७ जणांची प्राथमिक, तर ४३ जणांची अंतिम निवड झाली. एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी उमेश देशमुख यांनी तरुणांचा पुणे-मुंबईकडे असणारा नोकरीचा कल कोल्हापूरकडे वाढावा यासाठी प्रयत्न व्हावेत असे मत मांडले. स्वरूप कदम यांनी असा मेळावा दर महिन्याला व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. कौस्तुभ गावडे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. जमीर करीम यांनी प्रास्ताविकात रोजगार मेळाव्याची माहिती दिली.

पुण्य नगरी | शनिवार, २८ जून २०२५

# तरुण पिढीला कामात गुंतवून प्रोत्साहन द्या : पालकमंत्री

## रोजगार मेळाव्यात २९० उमेदवारांची नियुक्ती; कौशल्य विभागाकडून २८ उद्योजकांचा सहभाग



कोल्हापूर : प्रतिनिधी

एकीकडे शिक्षण जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच दुसऱ्या बाजूला एका विशिष्ट तरुण वयात रोजगारही महत्त्वाचा असल्याचे सांगून तरुणांना कामात गुंतवून त्यांना भविष्यात तयार करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. स्वामी विवेकानंद संस्थेच्या सभागृहात आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ते बोलत होते.

मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत जिल्हा कौशल्य विकास विभाग व विवेकानंद संस्थेच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी पालकमंत्री आबिटकर, स्वामी विवेकानंद संस्थेचे अभयकुमार साळुंखे, सीईओ कौस्तुभ गावडे, सहायक आयुक्त कौशल्य विकास जमीर करीम, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी उमेश देशमुख, गोकुळ एमआयडीसीचे अध्यक्ष स्वरूप कदम आदी उपस्थित होते.

पालकमंत्री आबिटकर यांनी, उपस्थित २८ उद्योजकांनी १४७० रिक्त पदांसाठी उपलब्ध केलेली संधी हजारो तरुणांसाठी महत्त्वाची असल्याचे नमूद केले. या मेळाव्यात ६३६ उमेदवार होते. पात्रतेनुसार ३६० मुलाखती झाल्या, त्यापैकी प्राथमिक २४७, तर अंतिम ४३ जणांची निवड झाली. एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी उमेश देशमुख यांनी मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानाबाबत माहिती देऊन तरुणांचा पुणे-मुंबईकडे असणारा नोकरीचा कल कोल्हापूरकडे वाढावा, यासाठी अधिकचे प्रयत्न व्हावेत, असे मत व्यक्त केले. प्रास्ताविकात जमीर करीम यांनी रोजगार मेळाव्याबाबत माहिती दिली.

28/6/25

28/6/25

# अकरावीची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया एक, गोंधळ अनेक

## शिक्षण विभागाचा अनागोंदी कारभार; वेळापत्रकात वारंवार बदल



**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

राज्यभरात यावर्षी वाजतगाजत सुरू केलेल्या अकरावी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचा पुरता बोजवारा उडाला आहे. वारंवार वेळापत्रकात होत असलेल्या बदलांमुळे विद्यार्थ्यांसह पालक हैराण झाले आहेत. याला राज्याच्या शिक्षण विभागाचा अनागोंदी कारभार जबाबदार असल्याचे विद्यार्थी, पालकांमधून बोलले जात आहे. अकरावीची राज्यात प्रवेश प्रक्रिया एक अन् गोंधळ अनेक, अशी अवस्था आहे.

यावर्षी प्रथमच राज्यस्तरावरून एकच अकरावीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. कोल्हापूर जिल्ह्यात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेसाठी जिल्ह्यातील २८५ कनिष्ठ महाविद्यालयांतील ६६ हजार १० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीसाठी ४१ हजार ८९९ ऑनलाईन नोंदणी झाली. २६ जून रोजी सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर होणार होती. प्रत्यक्षात त्या दिवशी रात्री उशिरापर्यंत गुणवत्ता यादी जाहीर झाली नाही. अल्पसंख्याक समुदायाच्या शाळा, महाविद्यालयांतील प्रवेश क्षमता फेरबदल करणे अपेक्षित आहे.

काही न्यायालयीन प्रकरणे व तांत्रिक बाबींमुळे २६ जून रोजी सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करता येणार नसल्याचे परिपत्रक राज्याचे शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी काढले. मात्र, यातही आता बदल करण्यात आला. अचानकपणे शनिवारी सायंकाळी सुधारित अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली.

प्रवेश प्रक्रिया नेमकी किती दिवस चालेल व किती दिवसांत पूर्ण होणार, याची माहिती कोणीही सांगू शकत नाही. त्यामुळे प्रवेशाच्या अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाल्याने विद्यार्थी इतर अभ्यासक्रमांकडे वळले आहेत.

### दहावीचा निकाल वेळेत लागूनही प्रवेश प्रक्रिया रखडली

- विद्यार्थी-पालकांचा उद्बोधन वर्ग न घेता प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली
- शहरी, ग्रामीण विद्यार्थी-पालकांना ऑनलाईन प्रवेश फॉर्ममधील मुद्द्यांची कसलीही कल्पना नाही
- विद्यार्थ्यांनी त्या-त्या प्रवर्गातील हमीपत्र जोडले असून, मूळ प्रमाणपत्र दाखल केल्यावर समस्या निर्माण होणार
- अकरावीचे वर्ग १ जुलै रोजी सुरू होण्याची शक्यता मावळली

> शासनाने दहावीचा निकाल लवकर लावला. तरीदेखील अकरावीचे वर्ग १५ जुलैपूर्वी सुरू होण्याची शक्यता नाही. कारण, प्रवेश प्रक्रियेमधील गोंधळ आजअखेर संपलेला नाही. राज्य सरकारने शिक्षण विभागाच्या कारभारात गांभीर्याने लक्ष घालून प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी ही अपेक्षा.
>
> - **डॉ. आर. आर. कुंभार**, प्राचार्य, विवेकानंद महाविद्यालय

### विद्यार्थ्यांना ५ विषयांत १७५ गुण आवश्यक

दहावी परीक्षेतील बेस्ट ऑफ फाईव्हच्या निकषानुसार ५ विषयांत १७५ पेक्षा कमी गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतून वगळण्यात आले आहे. त्यांना पुरवणी परीक्षा देऊनच १७५ पेक्षा जास्त गुण मिळवावे लागणार आहेत. त्यानंतरच सुरू असलेल्या फेरीत प्रवेशासाठी त्यांना सहभागी होणे शक्य होणार आहे.

पुढारी | रविवार, २९ जून २०२५

# तरुणपिढीला कामात गुंतवून प्रोत्साहन द्या : पालकमंत्री

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

एकीकडे शिक्षण जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच दुसऱ्या बाजूला एका विशिष्ट तरुण वयात रोजगार महत्त्वाचा आहे. तरुणांना कामात गुंतवून त्यांना भविष्यात तयार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत जिल्हा कौशल्य विकास विभाग व विवेकानंद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे प्राचार्य अभयकुमार साळुंखे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी उमेश देशमुख, गोकुळ एमआयडीसीचे अध्यक्ष स्वरूप कदम, स्वामी विवेकानंद संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे उपस्थित होते.



कोल्हापूर : जिल्हा कौशल्य विकास विभाग व विवेकानंद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर. समवेत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, उमेश देशमुख, स्वरूप कदम, कौस्तुभ गावडे आदी.

पालकमंत्री अबिटकर म्हणाले, कौशल्य विभागाने औद्योगिक विकास महामंडळाच्या मदतीने आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्यातील संधीचा जास्तीत जास्त युवकांनी उपयोग करावा. २८ उद्योजकांनी १४७० रिक्त पदांसाठी मेळाव्यात आलेल्या हजारो तरुणांसाठी महत्त्वाची संधी होती. त्यांच्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नक्कीच मिळेल. प्रास्ताविकात जमीर करीम यांनी रोजगार मेळाव्याबाबत माहिती दिली. मेळाव्यात ६३६ उमेदवार होते. पात्रतेनुसार ३६० मुलाखती घेण्यात आल्या, त्यापैकी प्राथमिक निवड २४७ तर ४३ जणांची अंतिम निवड झाली.

तरुण भारत संवाद

सोमवार, ३० जून २०२५

# अकरावीचे प्रत्यक्ष प्रवेश आजपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर झाली. पहिल्या प्रवेश फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी आज (दि. ३०) पासून सुरू होणार आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेत पहिल्या फेरीतील प्रवेश ३० जून ते ७ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांनी पूर्ण करावयाचे आहेत. दुसरी प्रवेश यादी ९ जुलै रोजी जाहीर होणार आहे.

अकरावी प्रवेशाची गुणवत्ता यादी

■ ३० जून ते ७ जुलैपर्यंत पहिल्या फेरीतील प्रवेश

शनिवारी जाहीर झाली. शाखानिहाय कटऑफ वेगवेगळा जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये विज्ञान विभागासाठी राजाराम कॉलेज ९१.८०, विवेकानंद कॉलेज ९१.८०, न्यू कॉलेज ९१.६० तर एस. एम. लोहिया हायस्कूलचा ९१ टक्के कटऑफ आहे. वाणिज्य शाखा इंग्रजीसाठी कॉमर्स कॉलेजचा ९२.४० टक्के, विवेकानंद कॉलेजचा ८६.४० तर डी. डी. शिंदे हायस्कूल ८५.६० टक्के कटऑफ आहे. वाणिज्य मराठीसाठी कॉमर्स कॉलेज ७८ टक्के, न्यू कॉलेज ७६.८० टक्के कट ऑफ आहे. कला शाखेसाठी न्यू कॉलेज ७६.२० टक्के, राजाराम कॉलेज ७१.८० टक्के इतका कटऑफ आहे. तरी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या कॉलेजमध्ये जावून प्रवेश घ्यावा, असे आवाहन शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

तरुण भारत सोमवार, ३० जून २०२५

# रोजगार मेळाव्यातून २९० जणांची नियुक्ती

कोल्हापूर : शहरातील स्वामी विवेकानंद संस्थेच्या सभागृहात शुक्रवारी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा झाला. ६३६ उमेदवारांनी यावेळी सहभाग नोंदवला. पात्रतेनुसार ३६० मुलाखती झाल्या त्यापैकी प्राथमिक निवड २४७ तर अंतिम निवड ४३ जणांची झाली. मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत जिल्हा कौशल्य विकास विभाग व विवेकानंद संस्थेच्या संयुक्तकडून रोजगार मेळावा करण्यात आले होते.

मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सुरू योजनेतून तरुणांना सहा हजार, आठ हजार, दहा हजार असा स्टायफंड देण्यात येतो. अशी माहिती पालकमंत्री आबिटकर यांनी उद्घाटनाप्रसंगी केले.

स्वामी विवेकानंद संस्थेचे अभयकुमार साळुंखे, जमीर करीम, उमेश देशमुख, गोकुळ एमआयडीसीचे अध्यक्ष स्वरूप कदम, सीईओ कौस्तुभ गावडे आदी, उपस्थित होते.